मिरा भाईंदर महानगरपालिका
माहिती व जनसंपर्क विभाग
प्रसिद्धी पत्रक

- **दिल्लीतील नीती आयोगाच्या कार्यक्रमात सन्मानित होणार फराळ सखीच्या महिला**
- **मिरा भाईंदर महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक राधाबिनोद अ. शर्मा (भा.प्र.से) निती आयोगाच्या कार्यक्रमात प्रमुख वक्ते**

**मिरा-भाईंदर, १७ मार्च २०२५:** मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या फराळ सखी उपक्रमातील ८ महिलांचा निती आयोगातर्फे सत्कार केला जाणार आहे. येत्या २० मार्च रोजी नवी दिल्ली येथे आयोजित कार्यक्रमात हा सत्कार होणार आहे. महिला उद्योजकतेला चालना देण्याकरीता या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमात आयुक्त तथा प्रशासक राधाबिनोद अ. शर्मा (भा.प्र.से) यांना प्रमुख वक्ते म्हणून आमंत्रित करण्यात आले आहे.

महिला उद्योजकतेला चालना देणाकरिता नीती आयोगाच्या 'महिला उद्यम मंच' तर्फे (WEP: Women Entrepreneurship Platform) 'महिला नेतृत्वाखाली उद्योजकतेचा विकास' (Women-led Development through Entrepreneurship) या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. ही कार्यशाळा २० मार्च २०२५ रोजी दुपारी ४:०० वाजता, त्रावणकोर हाऊस, नवी दिल्ली येथे होणार आहे. या कार्यक्रमात, नीती आयोगाच्या मुख्य आर्थिक सल्लागार ॲना रॉय यांच्या उपस्थितीत सह, प्रमुख पाहुणे म्हणून केंद्रीय सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग राज्यमंत्री शोभा करंदलाजे, नीती आयोगाचे मुख्य कार्यकारी अधिकारी बी. व्ही. आर. सुब्रह्मण्यम आणि अपोलो हॉस्पिटलच्या संयुक्त व्यवस्थापकीय संचालक कार्यालय संगीता रेड्डी तसेच केंद्र आणि राज्य सरकारच्या अधिकाऱ्यांसह उद्योजकता क्षेत्रातील अनेक तज्ज्ञ उपस्थित राहणार आहेत.

या कार्यक्रमात, महिला उद्योजकतेला चालना देण्यासाठी विविध योजना आणि उपक्रमांचे उद्घाटन करण्यात येणार आहे. या कार्यशाळेत मिरा भाईंदर शहरातील फराळ सखी उपक्रमातील ८ महिलांचा निती आयोगातर्फे सत्कार केला जाणार आहे. महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक राधाबिनोद अ. शर्मा (भा.प्र.से) यांना या कार्यक्रमात प्रमुख वक्ते म्हणून आमंत्रित करण्यात आले. ते 'फराळ सखीचा प्रवास आणि प्रभाव' या विषयावर आपले विचार मांडणार आहेत.

फराळ सखीच्या यशामुळे महिला उद्योजकतेला चालना मिळाली असून, हा उपक्रम महिलांच्या आर्थिक सशक्तीकरणासाठी मार्गदर्शक ठरला आहे. या महिलांचा राष्ट्रीय स्तरावर गौरव होत असून त्या देशातील इतर महिलांसाठी प्रेरणा ठरल्या आहेत. नीती आयोगाच्या 'महिला नेतृत्वाखाली उद्योजकतेचा विकास' या कार्यशाळेतून महिला सशक्तीकरणाला नवी दिशा मिळेल, असा विश्वास मनपा आयुक्त तथा प्रशासक राधाबिनोद अ. शर्मा (भा.प्र.से) यांनी व्यक्त केला आहे.

- काय आहे फराळ सखी उपक्रम?

मिरा भाईंदर महानगरपालिकेने मागील वर्षी दिवाळीत प्रायोगिक तत्वावर 'फराळ सखी' हा उपक्रम राबवला होता. घरगुती पातळीवर फराळ तयार करणाऱ्या महिलांना एकत्र करून त्यांना बचत गटाच्या माध्यमातून प्रशिक्षण देण्यात आले होते. महिलांना मध्यवर्ती स्वयंपाकघर आणि आधुनिक यंत्रसामग्रीची सुविधा करून देण्यात आली होती. या महिलांनी तब्बल ३ टन फराळाचे पदार्थ बनवून त्याची यशस्वी विक्री केली होती. या यशस्वी प्रयोगाची दखल घेऊन नीती आयोगाच्या, महिला उद्यमता मंचाच्या 'अवॉर्ड टू रिवॉर्ड' (Award to Reward) कार्यक्रमात या उपक्रमाची निवड करण्यात आली. यानंतर निवडलेल्या २५ महिलांना विपणन, ब्रँडिंग, विक्री, फायनान्स आणि व्यवस्थापन आदी कौशल्यांचे विशेष प्रशिक्षण देण्यात आले. तर इंडस्ट्रीअल भेटींद्वारे स्वयंपाक व्यवस्थापन, कीचन व्यवस्थापन, कर्मचारी व्यवस्थापन आदीविषयो प्रत्यक्ष माहिती देण्यात आली. पुढे, मूल्यांकन चाचणीतून निवडलेल्या ८ महिलांना क्लाउड किचन आणि आवश्यक उपकरणे देऊन त्यांना स्वयंपूर्ण व्यावसायिक बनवण्यात आले.

शहर अभियंता
मिरा-भाईंदर महानगरपालिका

**Mira Bhaindar municipal corporation**
**Public Relation Department**
**Press Release**

**Women from Faral Sakhi to Be Honoured at NITI Aayog Event in Delhi**
**Mira Bhayandar Municipal Corporation Commissioner Radhabinod A. Sharma (IAS) to Deliver Keynote Address**

**Mira Bhayandar, March 17, 2025:** Eight women from the Faral Sakhi initiative of the Mira Bhayandar Municipal Corporation are set to receive national recognition at a prestigious event organized by NITI Aayog in New Delhi. The felicitation will take place during a program focused on promoting women entrepreneurship, scheduled for March 20, 2025. Commissioner and Administrator Radhabinod A. Sharma (IAS) has been invited as the keynote speaker at the event.

The event, titled 'Women-led Development through Entrepreneurship,' is being organized by NITI Aayog's Women Entrepreneurship Platform (WEP) to foster and promote women entrepreneurship across the country. It will be held on March 20, 2025, at 4:00 PM at Travancore House, New Delhi. The program will be attended by key dignitaries, including Chief Economic Advisor to NITI Aayog Anna Roy, Union Minister of State for Micro, Small and Medium Enterprises Shobha Karandlaje, Chief Executive Officer of NITI Aayog B. V. R. Subrahmanyam, and Joint Managing Director of Apollo Hospitals Sangeeta Reddy, along with senior officials from central and state governments and industry experts in the field of entrepreneurship.

As part of the event, various schemes and initiatives aimed at encouraging women entrepreneurship will be inaugurated. The eight women from the Faral Sakhi initiative will be felicitated for their exemplary success in becoming self-reliant entrepreneurs. Commissioner Radhabinod Sharma will deliver the keynote address on the topic 'The Journey and Impact of Faral Sakhi with WEP' and share insights into how the initiative has empowered women and boosted economic independence at the grassroots level.

Commissioner Sharma expressed confidence that the recognition of Faral Sakhi at a national level will inspire more women across the country to embrace entrepreneurship and become self-sufficient.

The recognition at NITI Aayog's event marks a significant milestone in the journey of Faral Sakhi and reinforces the Mira Bhayandar Municipal Corporation's commitment to fostering women-led economic development.

## About the Faral Sakhi Initiative

The Faral Sakhi initiative was introduced by the Mira Bhayandar Municipal Corporation on a pilot basis during Diwali last year. The program aimed to empower women engaged in making traditional snacks (faral) at home by organizing them through self-help groups and providing professional training and infrastructure support.

Under the initiative, women were trained in food preparation, branding, marketing, and financial management. They were provided access to a central kitchen equipped with modern machinery, enabling them to produce up to 3 tons of faral products, which were successfully marketed and sold.

Encouraged by its success, the initiative was selected for the *'Award to Reward'* program under NITI Aayog's Women Entrepreneurship Platform. As part of this recognition, 25 women were given specialized training in business skills, including sales, financial planning, and management. They also participated in industrial visits to gain practical knowledge about kitchen and employee management.

Following a rigorous assessment, eight women were selected and provided with cloud kitchens and necessary equipment, transforming them into independent entrepreneurs. Their success stands as a model for women empowerment and grassroots entrepreneurship.

City Engineer
Mira-Bhayandar Municipal Corporation